महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २६३ वा | दिनांक : १५/०८/२०२५ | वार : शुक्रवार

## शिवसेना आणि कम्युनिस्ट एकत्र येण्यामागे देशप्रेमाचा धागा - उद्धव ठाकरेंचा जनसुरक्षा विधेयकाला कडवा विरोध



**मुंबई** : स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला माजी मुख्यमंत्री व शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबई येथील यशवंतराव सेंटर येथील राज्यव्यापी परिषदेत भाषण करत अनेक विषयांना हात घातला. तसेच जन सुरक्षा विधेयकाला विरोध दर्शवत सरकारवर टीका केली आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, राजकारणात मतभेद आहेतच, पण मी याला मतभिन्नता म्हणतो. आणखी कोणीतरी म्हणेल की उद्धव ठाकरे यांच्या व्यासपीठावर काय करत आहेत. डाव्यांच्या व्यासपीठावर म्हणजे कम्युनिस्टांच्या व्यासपीठावर. शिवसेना आणि कम्युनिस्टचा भयंकर संघर्ष झालेला आहे. कालांतराने कळते की ज्या कारणासाठी लढत आहोत, ते कारण बाजूलाच राहते आणि आपण उगाचच आपल्यात भांडत आहोत. राजकारणात व्यक्तिगत द्वेष असता कामा नये. म्हणूनच मी पवार साहेब किंवा कम्युनिस्ट एकत्र का येऊ शकलो, कारण देशप्रेम हा एक कॉमन धागा आमच्यात आहे.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, जे कोणी देशद्रोही असेल त्याला फासावर लटकावलेच पाहिजे, यात दुमत असूच शकत नाही. सरकार जो कायदा आणत आहे, तो कायदा मी पण वाचला आहे. त्यात देशद्रोह्याचा उल्लेखच नाही. सुरुवातीच्या पॅराग्राफमध्ये दोन वेळा 'कडव्या डाव्या' असा उल्लेख केला गेला आहे. म्हणजे काय? कडवे डावे काय आणि उजवे काय? आपल्या संविधानात याचा उल्लेखच नाही. एकतर कळत आहे की या भाजपचे स्वातंत्र्य चळवळीत काही योगदानच नव्हते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही हे नव्हते. आयत्या बिळावर नागोबा म्हणून बसले आहेत आणि लोकांकडून दूध पाजायची अपेक्षा करत आहेत.

भाजपने कोणते आदर्श निर्माण केले नाहीत, कसलेही योगदान नाही मग काय करायचं तर दुसऱ्यांचे आदर्श चोरायचे. मग जरा कुठे काही झाले की म्हणतात हे नेहरूंच्या काळात झाले आहे. अमुक-अमुक झाले की लगेच हे नेहरूंच्या काळात झाला आहे, अहो तुमचा जन्म सुद्धा नेहरूंच्याच काळात झाला आहे, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान मोदींना डिवचले. यात नेहरूंचा काय दोष? आता जर नेहरूंना दोष देणार असाल तर आता 11 वर्षे झाली तर तुम्ही काय केले? तेव्हा वल्लभभाई पंतप्रधान झाले असते तर आज हा संघ परिवार दिसलाच नसता. कारण त्यावेळेला वल्लभभाई पटेल यांनी संघ परिवारावर बंदी घातली होती. मग आता बोला नेहरू पाहिजे होते की वल्लभभाई पटेल पाहिजे होते. दहशतवाद किंवा देशद्रोहाच्या विरोधातील कायदा आणणार असाल तर त्याला आमचा पाठिंबा आहे.

जो कोणी देशाच्या विरोधात कारवाया करत असेल, मग त्याचा जात धरण बघू नका. त्याचा देशद्रोही हाच धर्म आणि लटकवा त्याला फासावर आम्ही पाठिंबा देतो. आजची एक बातमी वाचली, वसई विरारच्या माजी आयुक्ताच्या घरात पैशांची बॅग सापडली, त्याला अटक केली. मग मंत्र्यांच्या घरात पैशांची बॅग सापडली तेव्हा मंत्र्याला का अटक नाही केली? त्याला समज देऊन सोडून देतात. पुढच्या वेळी बॅग अशी उघडी नको ठेवत जाऊ सांगत असतील, असा टोमणा उद्धव ठाकरेंनी लगावला.

## शिंदेंचा मंत्री मनोज जरांगेंच्या भेटीला:जरांगेंनी वाचला फडणवीसांच्या तक्रारीचा पाढा



**लातूर** : मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून रान पेटवणाऱ्या मनोज जरांगे पाटील आज लातूरच्या दौऱ्यावर आहेत. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरूवारी त्यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांत काय चर्चा झाली? याचा तपशील समोर आला नाही. पण माध्यमांपुढे बोलताना जरांगेंनी पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली. मराठा समाजाने भाजपला सत्ता दिली ही बाब कुणीही नाकारू शकत नाही. पण ते एवढ्या लवकर उपकार विसरतील असे वाटले नव्हते, असे ते म्हणालेत.

मनोज जरांगे येत्या 29 ऑगस्ट रोजी मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला बसणार आहेत. यासाठी ते विविध जिल्ह्यांना भेट देऊन तेथील मराठा समाजाला एकजूट करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी गुरूवारी लातूरच्या मराठा बांधवांशी संवाद साधला. यावेळी लातूरच्या दौऱ्यावर असणाऱ्या मंत्री प्रताप सरनाईक यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी जरांगे यांनी त्यांच्यापुढे आरक्षणाच्या मुद्यावर मराठा समाजाची फसवणूक झाल्याचा जाहीर आरोप केला.

मनोज जरांगे यावेळी सरनाईकांना उद्देशून म्हणाले, तुमच्या मुख्यमंत्री साहेबांनी आम्हाला खवळून टाकले. त्यांनी एकाचेच (ओबीसी) काम करण्याची भाषा केली. तसेच आम्हाला पोलिस पाहून घेतील असा इशारा दिला. यामुळे मराठ्यांची लाट पुन्हा उसळली. मराठ्यांनी सत्ता दिली हे त्यांना (फडणवीस) नाकारता येणार नाही. ते एवढ्या लवकर उपकार विसरतील असे आम्हाला वाटत नव्हते. आम्ही 7 महिने शांत बसलो होतो. आम्ही त्यांच्याविरोधात एकही शब्द बोललो नाही. ते आम्हाला आरक्षण देतील असा आमचा गैरसमज होता. पण आता तो दूर झाला आहे.

मराठा समाजाची फसवणूक झाली हे आता आम्हाला समजले आहे. धनगर समाजाचीही अशीच फसवणूक झाली. ते आरक्षण देतो म्हणाले, पण दिले नाही. आमचेही तसेच झाले. लाडक्या बहिणींचेही तसेच झाले. शेतकऱ्यांचेही तसेच झाले. त्यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. गरीब शेतकऱ्यांनी त्याची वाट पाहिली, पण अजून काहीच झाले नाही.

मनोज जरांगे पुढे म्हणाले, कुणीही कुणाचीही फसवाफसवी करू नये. आम्ही काही त्यांचे वैरी नाहीत. विरोधक नाहीत. तुम्ही मंत्री महोदय आहात. तुमच्यासह एकनाथ शिंदे व अजित पवारांनाही हे ठावूक आहे. ते काही वैरी नाहीत, पण असा खुणशीपणा चांगला नाही. ही काय भाषा झाली? तुम्ही आमच्या महिलांवर पुन्हा आंतरवाली सराटीसारखा हल्ला करणार असे अर्थ आम्ही काढायचा का? संविधानावरील पदावर बसलेला माणूस असा कसा बोलू शकतो. एका जातीला असे धरणार आणि दुसऱ्या जातीला तसे धरणार असे कसे शक्य होऊ शकते.

तुमच्या आमच्याकडून ठीक आहे. आपण राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करतो. गरीब जनता जातीची भाषा करू शकतात, पण मुख्यमंत्रीच असे बोलत असल्यामुळे मराठ्यांना धक्का बसला. भाजपच्या लोकांनाही बसला आहे. भाजपचेही लोक मला फोन करून हा अवघडच खेळ झाल्याचे सांगतात. त्यांची मुले आता त्यांनाच आरक्षणाविषयी प्रश्न विचारत आहेत, असेही जरांगे यांनी यावेळी सांगितले.

## आयारामांमुळे संघ परिवार प्रदूषित होण्याची भीती : स्वामी गोविंददेव गिरी महाराजांची भाजपच्या आयात संस्कृतीवर टीका



**पुणे** : अयोध्येतील रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराजांनी भाजपमधील आयाराम संस्कृतीवर सडकून टीका केली आहे. ज्या लोकांना यापूर्वी केव्हाही संघ पटला नव्हता, हिंदुत्व पटले नव्हते, अशा लोकांची भाजपमध्ये आयात करण्यात आली आहे. यामुळे नाल्यांमुळे जशी गंगा प्रदूषित झाली आहे, तसा संघ परिवार प्रदूषित झाला आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

गत काही वर्षांत काँग्रेस व इतर विरोधी पक्षांच्या अनेक बड्या नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. यामुळे भाजपच्या मूळ कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांवर अन्याय होत असल्याचा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर गोविंद गिरी महाराजांनी पुण्यात एका पुस्तक प्रकाश कार्यक्रमात बोलताना वरील टीका केली आहे. ते म्हणाले, या शताब्दी वर्षात पूज्य डॉक्टरांपासून अनेक प्रचारकांची नावे समोर येत आहेत. यामुळे डोळे भरून येत आहेत. या लोकांनी जे तप केले, जो त्याग केला, त्या तपाला व त्यागाला न्याय द्यायचा असेल, तर देश टिकवणे आपली जबाबदारी आहे. यासाठी संघाने सावध राहण्याची गरज आहे असे मला वाटते.

कारण, संघाच्या व्यापक झालेल्या कार्यात वेगवेगळ्या मार्गाने आयात केलेली मंडळी येतात. त्यांचे संस्कार वेगळे आहेत. ज्या लोकांना कधी संघ पटला नाही, हिंदुत्व पटले नाही, त्यांना नैतिकता कशाशी खातात हेच कळत नाही. या लोकांची आयात फार मोठ्या प्रमाणात झाली आहे. गंगा शुद्धच आहे. पण गंगेत येऊन मिसळणाऱ्या नाल्यामुळे ती प्रदूषित झाली आहे. त्यानुसार संघ परिवारही आयारामांमुळे प्रदूषित होईल अशी भीती मला वाटत आहे, असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले, प्राचीन ते मध्ययुगीन काळात भारतावर वेगवेगळ्या शक्तींची, परकीयांची आक्रमणे झाली. अनेक संकटे आली. मंदिरे पाडली गेली. विद्यापीठे उद्ध्वस्त केली गेली. हिंदुत्वावर आघात केला गेला. पण संघाने सुनियोजितपणे त्याचा प्रतिकार केला. देशाची संस्कृती व आंतरिक सजीवता कायम ठेवली. यामुळे भारत देशाला कुणालाही संपवता आले नाही. एवढेच नाही तर स्वतः संघालाही तीनवेळा संपवण्याचा प्रयत्न झाला. आपल्याला हा वारसा सांभाळून देशाला पुढे न्यायचे आहे.

जगाच्या इतिहासात काही धर्मांध शक्तींनी अनेक धार्मिक स्थळे उद्धवस्त केल्याची उदाहरणे आहेत. पण जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे, ज्याने हिंदुत्वाची आस्था, प्रेरणा असलेले अयोध्येतील श्रीराम मंदिर पुन्हा त्याच ठिकाणी बांधून दाखवले. यापूर्वी देशाच्या सीमांचा संकोच झाला. पण यापुढे असा संकोच होता कामा नये. समाजाला लागलेली कीड शोधताना हिंदूंची संख्या कमी होणार नाही याचे भानही आपल्याला ठेवावे लागणार आहे. जग सुखी हवे असेल तर समर्थ भारतासाठी हिंदू हवे आहेत, असे गोविंदगिरी म्हणाले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५

# महिला महाविद्यालयात विश्‍व संस्कृत दिन उत्साहात साजरा




**छत्रपती संभाजीनगर : (प्रा. डॉ. प्रतिभा धोडकर)** (सौ.) डॉ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात दिनांक १३ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी महाविद्यालयात विश्व संस्कृत दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन संस्कृत विभागाच्या वतीने करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनीता बाजपाई, कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या छत्रपती शाहू महाराज संचालित आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रा. सौ. संध्या गोरठेकर, वरिष्ठ महाविद्यालयाच्या संस्कृत विभाग प्रमुख डॉ. मीनल श्रीगिरीवार, तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार, डॉ. प्रतिभा धोडकर, प्रा. विशाखा मुळे व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत सरस्वती पूजन व दीप प्रज्ज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विश्व संस्कृत दिनाच्या औचित्याने महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी ''कालिदास महात्म्यम्' या विषयावर लघुनाटिका सादर केली. या लघुनाटिका सादरीकरणात कु. भार्गवी मोदी, कु. राधिका दैठणकर, कु. ईशानी कुलकर्णी, कु. श्रद्धा खंडाळे, चि. तक्षक काळे, कु. अस्मिता धर्माधिकारी, कु. वैष्णवी ठोंबरे, कु. अर्पिता कदम, कु. शारदा जोशी, कु. खुशी बताडे, कु. उन्नती उमरकर, कु. प्राजक्ता सरोने, कु. भाग्यश्री नंद, कु. अमृता गायके यांचा सक्रीय सहभाग होता. विद्यार्थ्यांनी लघुनाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. लघुनाटिकेतील सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रमुख वक्त्या म्हणून आमंत्रित असलेल्या प्रा. सौ. संध्या गोरठेकर यांनी आधुनिक जीवनशैलीत आयुर्वेद शास्त्राचे महत्त्व तसेच आयुर्वेद आणि संस्कृत यांचा अन्योन्य संबंध तसेच संस्कृत विषय घेऊन विविध करिअरच्या संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. मीनल श्रीगिरीवार यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली यात सर्वप्रथम विश्व संस्कृत दिनाच्या आयोजनाचे उद्दिष्ट सांगितले व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विभागाद्वारे घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धांची माहिती दिली, शिवाय संस्कृत विभागाची गौरवशाली परंपराही उपस्थितांना सांगितली. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनीता बाजपाई यांनी संस्कृत विभागाद्वारे आयोजित दृक्श्राव्य माध्यमातून सादर करण्यात आलेल्या या लघुनाटिका आणि विश्व संस्कृत दिन उपक्रमाचे कौतुक करून संस्कृत ही केवळ एक भाषा नसून भारताच्या ज्ञान परंपरेचे द्योतक आहे. विद्यार्थ्यांनी तिच्या अध्ययनात रुची घ्यावी, हीच काळाची गरज आहे हे सांगून अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. माधुरी भावसार यांनी उपस्थितांचे आभार मानले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांचे योगदान उल्लेखनीय ठरले. शांतिमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय या शाळेत तिरंगा रॅली उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** दिनांक 14 ऑगस्ट 2025 या दिवशी मनपा प्राथमिक व माध्यमिक शाळा चिकलठाणा या शाळेत हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत चिकलठाणा परिसरात रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी शालेय समितीचे अध्यक्ष मा. मदन काका नवपुते,मा. श्री किशोरजी शितोळे, भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हा अध्यक्ष उपस्थित होते. माझी महापौर श्री भगवान घडामोडे,श्री सुनील जगताप,श्री किसन आप्पा दहीहंडे, विश्वास आण्णा नवपुते, सन्माननीय नगरसेविका ज्योतीताई नाडे, श्री किशन ढुबे, श्री मनोहर साळवे, श्री चंदन साळवे, श्री भागिनाथ नवपुते, सामाजिक कार्यकर्ते सुनील नाडे, श्री संजय चौधरी, श्री दीपक खोतकर, डॉक्टर सरोज नवपुते श्रीमती अश्विनी डांगे, महिला मोर्चा अध्यक्ष सौ उषाताई कदम, श्री कल्याण धुळे, श्री जगदीश नांदरकर तसेच मुकुंदवाडी व चिकलठाणा परिसरातील सर्व नागरिक उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते भारत माता प्रतिमेचे पूजन करण्यात आले व विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आला . कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे सर,श्री राठोड सर,श्री पठाण सर,श्रीमती राऊत मॅडम,श्रीमती भारद्वाज मॅडम, श्रीमती भिंगोले मॅडम, श्रीमती शिंदे मॅडम,श्री वाघ सर,श्री राजपुत, श्री चव्हाण सर, श्री सूर्यवंशी सर श्रीमती विद्या सासवडे ,श्रीमती तारो मॅडम, श्रीम साबळे मावशी व खापे मामा यांची उपस्थिती होती.




# संगीत आणि गीत मानवी मनाचे अविभाज्य घटक : कवी प्रा. वा. ना. आंधळे



**धरणगाव :** संगीताचा जन्म झाला नसता तर गितंही जन्माला आली नसती.या दोन्ही गोष्टी जन्माला आल्या नसत्या तर मानवी जीवन आणि मानवी मन यांना रुक्षता आली असती.मानवी आयुष्य सकारात्मकतेला मुकलं असतं. असे सांगत संगीताची व गीताची शक्तीस्थाने सुप्रसिद्ध कवी प्रा.वा. ना.आंधळे यांनी सप्रमाण कथन केली.काल दि.१०.ऑगस्ट२५रोजी श्री.आदिनाथ दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट व स्व.लक्ष्मीकांतजी डेडिया सर शिष्य परिवार आयोजित ,स्व.मास्टरजी लक्ष्मीकांतजी डेडिया स्मृती स्वरांजली तृतीय संगीत महोत्सवाचे उदघाटन प्रसंगी उदघाटक म्हणून बोलत होते. आपल्या मनोगतात ते पुढे म्हणाले की,वर्तमान काळ हा धकाधकीचा व मोठा स्पर्धेचा असल्यामुळे मनाला सक्षमता आणि सामर्थ्य मिळावे यासाठी संगीत आवश्यक आहे.अनेक आजार त्यातल्या त्यात मानसिक आजारावर संगीत हा यथोचित उपाय आहे.असे सांगत लय, ताल,आरोह अवरोह,नजाकत, यावर भाष्य करीत काही संगीत रागांच्या उदाहरणासह दोन गीतांच्या सादरीकरणातुन मानवी मनावर होणाऱ्या संस्काराकडे श्रोत्यांचे लक्ष वेधले. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.अजित डहाळे,प्रतिष्ठित व्यापारी कांतीलाल शेठ डेडिया,प.रा.हायस्कूल सोसायटीचे सचिव डॉ.मिलिंद डहाळे,एल आय सी चे डेव्हलपमेंट ऑफिसर श्री.रावतोळे यांची उपस्थिती होती. सदर संगीत महोत्सवात व्हायोलिन वादक भूषण चौधरी (हरिद्वार),बासरी वादक योगेश पाटील(एरंडोल),यांनी सोलो आणि समूह वादनाने समारंभाची सुरुवात झाली.सचिन भावसार, सौ.स्वाती देवा महाजन, सुधीर भावसार,संजय परदेशी,कु.उत्कर्षा भरत चौधरी, राजेश डहाळे, तनय डहाळे, नाना पवार, अहान डहाळे, कु.श्रेया भावे, प्रा.बी.एन.चौधरी, प्रदीप झुंजारराव यांच्या गीत गायनाने चांगलीच रंगत आणली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल जैन यांनी केले.सूत्र संचलन प्रा.ए. आर.पाटील यांनी केले तर आभार प्रतिक जैन यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५


## स्क्रॅप बँडचे क्रांती चौक येथे बहारदार सादरीकरण



**छत्रपती संभाजीनगर :** "हर घर तिरंगा" उपक्रमानिमित्त आयुक्त तथा प्रशासक महोदय मा. श्री. जी. श्रीकांत साहेब यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या स्क्रॅप बँडचे क्रांती चौक येथे बहारदार सादरीकरणमनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्क्रॅप बँडच्या माध्यमातून बहारदार वादन सादर करत वातावरण देशभक्तीच्या गगनभेदी घोषणांनी दुमदुमवले.या कार्यक्रमाला उपायुक्त मा. श्री. अंकुश पांढरे साहेब, शिक्षणाधिकारी मा. श्री भारत तीनगोटे सर, कार्यक्रमाधिकारी श्री सांगळे साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शाळेचे मुख्याध्यापक श्री के. बी. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक श्री सचिन गायकवाड, संगीत शिक्षक श्री सुभाष खिल्लारे, क्रीडाशिक्षक श्री दिपक महानवर, श्री सय्यद इरफान व श्री प्रमोद काळुसे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## स्वातंत्र्य दिनानिमित्त किनगाव राजा ग्रामपंचायतीतर्फे अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटप



**किनगाव राजा : (महेश मुंढे)** ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त किनगाव राजा ग्रामपंचायतीतर्फे 15 वित्त आयोगाच्या निधी मधून गावातील अंगणवाडी केंद्रातील विद्यार्थ्यांना गणवेशांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे लहानग्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.ग्रामपंचायतीच्या वतीने ७९ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी सरपंच प्रकाश मुंढे, उपसरपंच सौं. अर्चना दत्तात्रय झोरे,ग्रामसेवक अमोल मेहेत्रे, ग्रामपंचायत सदस्य संतोष काकड, दीपक पडुळकर, सखाराम हरकळ, योगेश चतूर, राजश्री जाधव, प्रतिभा जाधव, विठोबा चौरे, भगगवान साळवे, व ग्रामपंचायत चे कर्मचारी तसेच गावातील मान्यवर उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना नवीन गणवेश देण्यात आले.शैक्षणिक व सामाजिक जाणीवेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम स्तुत्य असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले. गणवेशामुळे मुलांमध्ये एकजुटीची भावना तर निर्माण होतेच, शिवाय स्वच्छता व शिस्तीचीही जाणीव होते, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका सौ. ज्योती भगवान साळवे, कु. रंजना रामचंद्र साळवे, कु. कांता रामभाऊ रणदिवे, कु. रेखा विश्वनाथ मुंढे, सौ. शीतल अजय जाधव, सौ. शिला रामेश्वर वल्टे यांनी विशेष परिश्रम घेतले.ग्रामपंचायत ने आयोजित केलेल्या ह्या कार्यक्रमाचे किनगाव राजा ग्रामस्थांनी भरभरून कौतुक केले.

## भारतीयांनी मनामनात आपला राष्ट्रध्वज रुजविला पाहिजे - प्रा. विनंती बसवंतबागडे




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** स्वातंत्र्य चळवळीतील बलिदानाचा इतिहास भारतीयांनी मनामनात आपला राष्ट्रध्वज रुजविला पाहिजे, असे प्रतिपादन फार्मसी महाविद्यालयाच्या प्रा. विनंती बसवंतबागडे यांनी केले. श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागात राष्ट्रीय सेवा योजना व माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हरघर तिरंगा व तंबाखूमुक्त अभियानांतर्गत गुरुवारी (ता. १४) रोजी प्रमुख व्याख्यात्या म्हणून त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे होते. यावेळी नगर शिक्षण विकास मंडळाचे संचालक प्रा. डॉ. सतिश शेळके, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. बसवंतबागडे म्हणाल्या की, राष्ट्रध्वजाचे महत्त्व व राष्ट्रध्वजाचा पूर्व इतिहास विस्ताराने त्यांनी या वेळी मांडला. याप्रसंगी उपस्थितांना त्यांनी तंबाखूमुक्ततेची शपथ दिली. अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. सपाटे यांनी तरुणांनी राष्ट्रध्वजाचा स्वाभिमान बाळगून त्याचे पावित्र्य जतन केले पाहिजे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत तर आभार प्रा. अशोक बावगे यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५


## देवगिरी महाविद्यालयात पालक मेळावा उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर : देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अकरावी विज्ञान वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी पालक शिक्षक मेळाव्याचे आयोजन दि. 14 ऑगस्ट 2025 रोजी महाविद्यालयाच्या रवींद्रनाथ टागोर सभागृहात करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर प्रमुख पाहुणे म्हणून जेईई नीटचे संचालक प्रा. एन. जी. गायकवाड प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य प्रा.सुरेश लिपाने उपप्राचार्य प्रा.विजय नलावडे यांची उपस्थिती होती. यावेळी पालक मेळाव्याचे प्रास्ताविक पर्यवेक्षक डॉ.किरण पतंगे यांनी केले. पालक मेळाव्याचे संयोजक उपप्राचार्य प्रा.अरुण काटे यांनी महाविद्यालयात होणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती देऊन विद्यार्थी ,पालक, शिक्षक असा ऋणानुबंध निर्माण व्हावा अशी भूमिका व्यक्त करून शिस्त, स्वच्छता, सुरक्षा, अभ्यासक्रम, आणि उपक्रम या पंचसूत्रीचे महत्व पटवून दिले. महाविद्यालयातला प्रत्येक शिक्षक हा विद्यार्थ्यांसाठी अज्ञानाकडून ज्ञानाकडे आणि ज्ञानाकडून यशाकडे कसी वाटचाल करेल यासाठी परिपूर्ण मेहनत घेत आहे याविषयी सविस्तर विवेचन केले.प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले जेईई नीटचे संचालक प्रा.एन.जी.गायकवाड यांनी संस्थेची आणि महाविद्यालयाच्या विकास आणि प्रगतीचे माहिती देऊन विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थी स्वत:च्या पायावर कसा उभा राहील हा दृष्टिकोन ठेवून महाविद्यालयाने राबवलेले विविध कोर्सेस, योजना,JEE, NEET, MHT-CET या सेल संबंधी पालक आणि विद्यार्थ्यांना सखोल आणि सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. अशोक तेजनकर यांनी महाविद्यालयाची वैभवशाली परंपरा सांगून राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर देवगिरी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या हितासाठी केलेले कार्य विशद केले तसेच पुढील पिढी घडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत यासाठी प्रत्येक मुलांनी आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार करावे आणि अकरावी आणि बारावी अशा दोन वर्षाचे सूक्ष्म नियोजन करून जीवनात यशस्वी व्हावे असे आवाहन केले.पालक मेळाव्याच्या निमित्ताने 'पालक जागरूकता शिबिराचे' आयोजन यानिमित्ताने करण्यात आले होते.यावेळी पालकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना मान्यवरांनी उत्तर दिले.जेईई-नीट सेलच्या संदर्भात माहिती प्रा.प्रताप काशीद यांनी दिली.पालक मेळाव्याच्या निमित्ताने विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून गीता सिताफळे, आमले भाग्यश्री यांनी मनोगत व्यक्त केली. पालक मेळावा यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षिका डॉ.सीमा पाटील जीवशास्त्र विभागप्रमुख प्रा.अनघा देशपांडे प्रा.रवींद्र पागोटे पालक मेळावा समिती प्रमुख प्रा.उमाकांत कोरे, प्रा.उज्ज्वला भोसले,प्रा.शिवांगी खंदारे,प्रा.मोनाली पालोदकर, प्रा.दिपाली काठोळे, प्रा.वंदना वाघमारे, प्रा.सुनीता गवळी, प्रा.विद्या सूर्यवंशी, प्रा.माधव जाधव, प्रा.साईनाथ लंबाडे प्रा.बालाजी कदम प्रा.अमर कंटुले प्रा.ऋषी कुमार जाधव डॉ.राजन राजपूत प्रा. नीलिमा वाबळे, प्रा.आशा करंडे, प्रा. मंजुषा पवार, प्रा. सुरज सोनवणे, प्रा मशरत पठाण, प्रा.वर्षा पाटील, प्रा.सरोज पांडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.मंजुषा पवार यांनी मानले.

## अंजना स्कूल ऑफ एक्सीलंस येथे व्यसनमुक्ती बद्दल संबोधन



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) :** अंजना स्कूल ऑफ एक्सीलंस, आसेगाव येथे PI लोंढे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली व्यसनमुक्ती बद्दल मुलांना माहिती देण्यात आली. यावेळी हेड कॉन्स्टेबल दराडे मॅडम यांनी मुलांना व्यसनामुळे आपल्या जीवनावर कसे वाईट परिणाम होऊ शकतात व त्याचा कौटुंबिक जीवनावर कसा परिणाम होतो याबद्दल मुलांना खूप चांगले मार्गदर्शन केले. तसेच अभ्यास करण्याचे व्यसन करा, मोठी स्वप्न पूर्ण करण्याचे व्यसन करा व समाजात आपली एक वेगळी ओळख निर्माण करा असे आव्हान करण्यात आले .यावेळी बनसोडे सर ( PSI ), जाधव सर (ASI) व कोळी सर (P.C) हे देखील मान्यवर उपस्थित होते.

## वाचन संस्कृतीस नवे बळ : वसतिगृहात ग्रंथालय व ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन



**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री श्री एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त डॉ. सौ. आय. बी. पी. महिला महाविद्यालयाच्या वसतिगृहात एक छोटेखानी ग्रंथालय सुरू करण्यात आले. या निमित्ताने ग्रंथालय व ग्रंथप्रदर्शन उद्घाटनाचा कार्यक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला.

वसतिगृह ग्रंथालय व ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. सुनीता बाजपेयी यांनी केले. त्यांनी ग्रंथप्रदर्शन पाहून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. आपल्या मनोगतात त्यांनी " वाचाल तर वाचाल" हा मोलाचा संदेश देत, विद्यार्थिनींना दररोज किमान ५ ते १० पाने वाचण्याचा सल्ला दिला. नियमित वाचनामुळे व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल होतो, असेही त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे सांगितले की, पुस्तक हे माणसाचे सर्वात विश्वासू मित्र आहे; ते कधीच सोडून जात नाही, उलट प्रत्येक वेळी काहीतरी नवे देऊन जाते."

त्यांनी हेही अधोरेखित केले की, वाचन हा फक्त छंद नसून जीवन समृद्ध करण्याचा मार्ग आहे. जितके वाचाल, तितके विचार खुलतील आणि जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत जाईल.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक ग्रंथपाल जावळे यांनी केले. त्यांनी भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या कार्याचा थोडक्यात परिचय करून दिला. त्यांनी सांगितले की, डॉ. रंगनाथन यांनी भारतात आधुनिक ग्रंथालय चळवळीची पायाभरणी केली व ग्रंथालयशास्त्रातील पंचसूत्री सिद्धांत मांडले, जे आजही जगभर मान्यताप्राप्त आहेत. त्यांच्या कार्यामुळे वाचनसंस्कृतीचा प्रसार झाला आणि सार्वजनिक तसेच शैक्षणिक ग्रंथालयांचा विकास झाला.

आभारप्रदर्शन रेक्टर सौ. प्रज्ञा शिरढोणकर यांनी केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. सुनीता बाजपेयी , डॉ. चक्रनारायण मॅडम, ग्रंथपाल जावळे मॅडम, श्री मधुकर जातोडे तसेच वसतिगृहातील सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. विद्यार्थिनींचा उत्साह आणि सहभाग पाहता, या उपक्रमामुळे वाचन संस्कृतीला नवे बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५


## कन्या सन्मान दिवस साजरा



**दौलताबाद (जावेद अहमद) :** जिल्हा अधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून कन्या सन्मान दिवस माळीवाडा येथे भावसिंगपुरा मंडळ तर्फ दि १४ ऑगस्ट गुरुवारी साजरे गुणवंत विध्यार्थीनी,कर्तबगार महिला,शिक्षिका विविध क्षेत्रातील मान्यवर महिला यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आलेश्रीभ्रूण हत्या बंद केल्याने देशाचे भविष्य उज्वल होईल ही जनजागृती करण्याचा उद्धिष्ट ने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेछत्रपती संभाजी नगर मध्ये १००० मुलांमध्ये ९१६ मुलीचे प्रमाण आहे सिंदूर ऑपरेशन मध्ये महत्वाची भूमिका बाजवणाऱ्या महिला अधिकारी विंग कमांडर व्योमिका सिंग आणि कर्नल सोफिया कुरेशी आज महिलांसाठी आदर्श निर्माण झाले आहेअसे प्रतिपादन मान्यवरांनीआप आपल्या भाषणात केलेकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच ज्योती नंदकिशोर मुळे हे होत्या प्रमुख पाहुणे म्हणून विधितज्ज्ञ किरण सोनवणे हे होत्यायावेळी तलाठी सूरज गिरी, प्रशांत वनकर , राजेंद्र आठवले ,साईनाथ बोन्द्रे,राजेंद्र सुलाने ,रोहित पवार, उपसरपंच मनिष गाजरे,ग्रामपंचायत अधिकारी प्रकाश तुपे,अकतर पटेल,ग्रा प सदस्य कडू कीर्तिकर,धमपाल गायकवाड, प्रवीण बर्डे,दौलताबाद उपसरपंच सैय्यद मतीन,किशोर जाधव,योगेश पाडळे,मुख्याध्यापक स्मिता खडके,देवरे मॅडम,बाबाजी मुळे,कृषी सहायक रंगनाथ पिसाळ,वैद्यकीय अधिकारी आशुतोष सुसडकर, मनिष फुलारे,कथार मॅडम,बंडू कांबळे,ज्योती घोरपडे, प्रमोद साठे,नंदकिशोर मुळे,नंदा खजिनदार, गणेश अस्वार,अंगणवाडी सेविका आशा कार्यकर्त्या जयश्री कीर्तिकर, पूजा वरकड,मुमताज शेख, बेबीताई लिहणार, वैशाली शेळके, रंजना नागे, संगीता काजूणे, बेबी जाधव जयश्री साळवे व ग्रामस्थ उपस्थिती होते

## इकरा पब्लिक शाळेतील विद्यार्थी शेख जैद याची राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड



**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूल मोहाडी शाळेचा विद्यार्थी शेख जैद बशीर याची राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे.राज्यस्तरीय १४ ते १७ वयोगटा साठीच्या सब जूनियर टेनिस क्रिकेट बॉल स्पर्धा नुकत्याच नागपूर येथे संपन्न झाल्या होत्या या स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निवडण्यात आला असून या संघात शेख जैद बशीर यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.राष्ट्रीय स्पर्धा दिल्ली येथे १८ ते २० ऑगस्ट दरम्यान होणार आहेत. शेख जैद यास क्रीडा शिक्षक आमीर खान आणि वसीम खान यांनी मार्गदर्शन केले.इकरा शिक्षण संस्थांचे अध्यक्ष डॉ.अ.करीम सालार,संस्था उपाध्यक्ष डॉ. इकबाल शाह,संस्था सचिव एजाज मलिक, इरफान सालार व शाळेचे चे प्राचार्य शेख शकील तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षवृंद यांनी जैद याचे अभिनंदन केले.

## शाळांच्या मनमानी शुल्क वसुलीला लगाम शिक्षण विभागाकडून कारवाईचा इशारा

**छत्रपती संभाजीनगर :** दि. १३ जिल्ह्यातील अनुदानित, विनाअनुदानित, स्वयं अर्थ सहाय्यित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मनमानी शुल्क वसुलीला लगाम लागावा यासाठी शिक्षण विभागाने आदेश काढला असून शुल्कवसुली विरोधात कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला असल्याने रिपब्लिकन विद्यार्थी सेनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यास यश मिळाले आहे.रिपब्लिकन विद्यार्थी सेनेचे सचिन निकम यांनी शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर यांच्या कडे जिल्ह्यातील अनेक अनुदानित, विनाअनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालय हे शासन मान्यतेविना “बिल्डिंग फंड”, “विकास निधी”, “प्रयोगशाळा शुल्क”, “क्रीडा शुल्क”, “मेडिकल शुल्क”, “प्रवेश शुल्क”, “परिक्षा शुल्क” अश्या विविध नावांनी अवैध शुल्क वसूल केले जात असल्याने या प्रकारावर शासनाचा कोणताही अंकुश राहिला नसल्याने पालक व विद्यार्थ्यांची राजरोसपणे लूट सुरू असल्याचा प्रकार तात्काळ थांबवावा अन्यथा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला होता संघटनेच्या मागणीनुसार पत्र काढून अवैध शुल्क वसुली तात्काळ थांबवा अथवा कारवाईला सामोरे जा असा सज्जड दम दिला आहे.शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर यांनी काढलेल्या पत्रात अनुदानित शाळा जर शासनाने ठरवलेल्या नियमावलीच्या बाहेर शुल्क वसूल करत असतील, तर त्या शाळेचे वेतनेत्तर शासन अनुदान तत्काळ रोखणे, शुल्क वसुलीबाबत दोषी ठरलेल्या शाळा व त्यांच्या व्यवस्थापनावर थेट प्रशासकीय कारवाई, मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ (RTE Act) व महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार, शुल्कवसुली हा कायद्याचा भंग ठरेल आणि त्याविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याचा ईशारा दिला आहे.तसेच सर्व अनुदानित शाळांनी दर्शनी भागात सदर शाळा ही अनुदानित असून या शाळेत शासन निर्णयानुसार कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत नाही असा फलक शाळेच्या दर्शनी भागात लावण्यात यावा, शाळांचे शुल्क आकारणी बाबत तपासणी पथक तयार करण्यात येत असुन सदर पथका मार्फत शाळांची तपासणी करण्यात येईल असे आदेशीत केले आहे.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १० वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५


# बहुसांस्कृतिक भारतासाठी, विषमतेविरुद्ध आवाज आणि ‘लोकप्रिय’ नेत्यालाही प्रश्न विचारण्याची गरज




अलीकडेच एनसीईआरटीच्या काही पाठ्यपुस्तकांमधून राज्यघटनेचा सरनामा काढून टाकल्याच्या बातम्यांवरून झालेल्या ताज्या वादविवादावर मी विचार करत असताना, मला पुन्हा एकदा ज्ञानाच्या राजकारणाचं महत्त्व जाणवलं. सत्ताधारी पक्षाला धार्मिक राष्ट्रवाद आणि बाजारपेठेतील मूलतत्त्ववाद यांपासून, किंवा एका आत्ममग्न/संभाव्य निरंकुश व्यक्तिमत्त्वावर आधारित राजकारणातून स्वतःला पूर्णपणे वेगळं करणं सोपं नाही. त्यामुळेच, सरनाम्यात मांडलेल्या महान समतावादी/धर्मनिरपेक्ष आदर्शांमुळे सत्ताधाऱ्यांना थोडं अस्वस्थ वाटलं तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. परंतु, शैक्षणिक क्षेत्राची आवड असलेला एक शिक्षक म्हणून, मला फक्त पाठ्यपुस्तकांतून काय वगळलं गेलं आहे, यावरच अडकून राहायचं नाही. माझा प्रश्न असा आहे की, ही पाठ्यपुस्तकं सरनाम्यासह उपलब्ध असली तरी, सध्याची शिक्षण पद्धत विद्यार्थ्यांना त्याचं महत्त्व समजावून सांगण्यास आणि ते आत्मसात करण्यास सक्षम आहे का? सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यातील वादाच्या भानगडीत न पडता, शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांनी या शैक्षणिक प्रश्नावर अधिक गांभीर्याने विचार करायला हवा.

या संदर्भात, मला एका कार्यशाळेचा अनुभव आठवतो, मला एकदा बिहारमधील ग्रामीण भागातील इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांच्या एका गटाशी संवाद साधण्याची संधी मिळाली (यासाठी शिक्षा स्वराजचे विकास शर्मा यांचे मी आभार मानतो). त्यांच्या राज्यशास्त्र विषयाच्या एनसीईआरटी पाठ्यपुस्तकाची सुरुवात सरनाम्याने होते. मी त्यांना तो सुंदर सरनामा वाचायला आणि त्यातील प्रत्येक शब्द अनुभवायला सांगितला: “आम्ही, भारताचे लोक, भारताला एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडवण्याचा गंभीरपणे निर्धार करून...” त्यांनी तो वाचला; पण त्यांना त्याचा अर्थ कळला का, याबद्दल मला खात्री नव्हती. घोकंपट्टी आणि परीक्षेवर केंद्रित असलेल्या शिक्षण पद्धतीत, ज्या प्रकारचा भारत आपल्याला घडवायचा आहे, त्याचं हे महान स्वप्न फक्त एक 'तथ्य' बनून राहिलं होतं, असं मला वाटलं-निर्जीव आणि आकर्षक शक्ती नसलेलं, किंवा बोर्डाच्या परीक्षेत फक्त दोन मार्कांसाठी विचारला जाणारा प्रश्न. पण तरीही, मी प्रयत्न सोडला नाही; मी यात हस्तक्षेप करायचा ठरवला आणि त्यांना विचार करायला लावायचं असं ठरवलं. मी त्यांना एक साधा प्रश्न विचारला: “तुम्हाला तुमच्या कुटुंबात किंवा गावात लोकशाहीचा अनुभव येतो का?” ते बराच वेळ शांत राहिले. यात आश्चर्य वाटण्यासारखं काहीही नव्हतं. आपल्या बहुतेक शाळांमधील शिक्षकांचे एकतर्फी संवाद किंवा वर्गातून जगलेल्या अनुभवांचं गायब होणं, यामुळे एक प्रकारची शांतता (a culture of silence) निर्माण होते. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातल्या गोठलेल्या शब्दांच्या पलीकडे पाहण्याची, स्वतःचे अनुभव व्यक्त करण्याची आणि नवीन प्रश्न विचारण्याची संधी क्वचितच मिळते.

ही अडचण मला माहित होती. तरीही, मी प्रयत्न करत राहिलो. आणि शेवटी, काही विद्यार्थ्यांनी बोलायला सुरुवात केली. एका मुलीने धीराने सांगितलं, “माझ्या कुटुंबात लोकशाही नाही. माझे वडील प्रत्येक निर्णय घेतात. आम्हाला काहीच स्वातंत्र्य नाहीये.” यातून मला त्यांना पितृसत्ताक व्यवस्थेवर विचार करायची संधी मिळाली आणि ती लोकशाहीच्या विचारांना कशी नाकारते हे समजावता आलं. लोकशाही म्हणजे संवाद, ऐकण्याची कला आणि सामूहिक निर्णय घेण्याची प्रक्रिया. पुढे, मी त्यांना असा विचार करायला लावला की, जर लोकशाही आपल्या कुटुंब, गाव, शाळा आणि समाजात पाळली जात नसेल, तर ती मोठ्या राजकीय व्यवस्थेत एक जीवनशैली म्हणून अस्तित्वात राहू शकते का.? या चर्चेने त्यांना उत्तेजित करायला सुरुवात केली. आणि यावेळी एक दलित मुलगी पुढे आली आणि आत्मविश्वासाने म्हणाली. “माझ्या गावात समानता नाही. आम्हाला कमी लेखलं जातं; आम्हाला कलंकित मानलं जातं.” तिचा आवाज ऐकून माझी खात्री पटली की, शिक्षण म्हणजे गंभीर प्रश्न विचारणं आणि गृहीत धरलेल्या जगाला आव्हान देणं आहे. या मुक्त संवादादरम्यान, त्यांनी त्यांच्या जगलेल्या अनुभवांना समोर आणलं आणि पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे पाहण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळालं.

या टप्प्यावर, मी त्यांना आणखी एक प्रश्न विचारला “तुम्हाला असं वाटतं का की, सरनामा फक्त फार मोठ्या अशा उदात्त शब्दांची माळ आहे आणि आपला देश ज्या पद्धतीने चालतो, तो या महान विचारांपासून खूप दूर आहे?” सुरुवातीला ते शांत होते किंवा कदाचित गोंधळलेले होते. मी त्यांच्या उत्तराची वाट पाहत राहिलो. आणि मग, एक मुलगी बोलू लागली: “भारतात आर्थिक असमानता आहे; ‘हिंदू विरुद्ध मुस्लिम’ राजकारण आहे; आणि जातीवर आधारित अत्याचार आहेत. पण तरीही, भारताने सरनाम्यातल्या संकल्पनेनुसार घडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.” आणि या गोष्टीमुळे मला काही निरीक्षणे मांडून सत्र पूर्ण करण्याची प्रेरणा मिळाली. मी त्यांना सांगितलं, “सरनामा जाणून घेण्याचा उद्देश राज्यशास्त्राच्या पेपरमधील दोन मार्कांच्या प्रश्नाचं उत्तर देणं एवढ्यापुरते नाही; तर महत्त्वाचं हे आहे की, एक लोकशाही/समतावादी/सांस्कृतिक बहुलतावादी भारताचं स्वप्न पाहणं, ज्यासाठी तुम्हाला आवाज उठवण्याची, सतर्क राहण्याची, अत्यंत **‘लोकप्रिय’** नेत्यालाही प्रश्न विचारण्याचं धाडस मिळवण्याची आणि समता, न्याय, लोकशाही आणि धार्मिक/सांस्कृतिक बहुलतावादासाठी सतत संघर्ष करण्याची गरज आहे.” त्यांच्या डोळ्यांत मला एक चमक दिसली. प्रत्येक मुलामध्ये प्रचंड क्षमता आहे, आणि जर आपण आपल्या तरुण विद्यार्थ्यांना भीतीशिवाय विचार करू दिलं, चिंतन करू दिलं आणि स्वतःचा आवाज व्यक्त करू दिलं, तर शिकण्याला एक वेगळाच अर्थ मिळेल. ते संवादात्मक, परस्परसंवादी आणि समस्या मांडणारं बनेल. आणि प्रत्येक गोष्ट जगलेल्या वास्तविकतेच्या आणि अनुभवांच्या आधारे गंभीरपणे तपासली जाईल. त्याचप्रमाणे, आपल्या शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये स्वातंत्र्य, समानता, हक्क, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता या संकल्पनांचा समावेश करणे एवढेच पुरेसे नाही. तर जोपर्यंत आम्ही पाऊलो फ्रेयर यांच्याद्वारे वर्णन केलेल्या बँकिंग स्वरूपाच्या शिक्षण पद्धतीला रद्द करणार नाही आणि त्याऐवजी 'संवादात्मक अथवा आपले प्रश्न' मांडणारी' शिक्षण पद्धत स्वीकारत नाही, तोपर्यंत राजकीयदृष्ट्या योग्य अभ्यासक्रमाचा आशय सुद्धा नष्ट होऊ शकतो किंवा घोकंपट्टीसाठी ते फक्त 'परीक्षेचं साहित्य' बनून राहू शकते. **या पार्श्वभूमीवर** आपल्याला आपला दृष्टिकोन अधिक विस्तृत करण्याची आणि एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकातून काय वगळलं गेलं किंवा काय समाविष्ट केलं गेलं, या पलीकडे जाऊन शिक्षणावर चर्चा करण्याची गरज आहे.


**प्रा. अविजित पाठक,**
समाजशास्त्राचे सेवानिवृत्त प्राध्यापक,
जे. एन. यू. नवी दिल्ली.
**मराठी अनुवाद : प्रा. प्रियदर्शन भवरे,**
बद्रीनारायण बारवाले
महाविद्यालय, जालना,

पूर्व प्रसिद्धी : द ट्रिब्युन

# सय्यद मोमीन आरीफ रहमतुल्लाह अलेह यांच्या १००० व्या उरसा निमित्त मिरवणूक




**दौलताबाद (जावेद अहमद)** : दौलताबाद येथील हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक प्रसिद्ध सय्यद मोमीन आरीफ रहमतुल्लाह अलेह यांच्या १००० व्या उरसा निमित्त दि १४ ऑगस्ट गुरुवारी रोजी संदल मिरवणूक ऐतिहासिक दौलताबाद किल्ल्या समोरील दर्गाह हजरत चांद शाह बोधले रहमतुलाह अलेह यांच्या दर्ग्यापासून गुरुवारी रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास सुरवात होऊन संदल दौलताबाद बसस्टॅन्ड,सय्यदवाडी,कुंभारग ल्ली,अब्दीमंडी पासून ढोल ताश्या व बँडच्या गजरात सैय्यद वाडी, रतनजी मोहला,कुरेशी मोहल्ला, अब्दीमंडी येथील युवकांनी चादरी सजवून बँड च्या गजरात सामील होऊन संदल रात्री अकरा वाजता दर्गा येथे पोहचला या संदल मध्ये जिल्हा भरातील तसेच मुंबई,पुणे,हैद्राबाद,बदायु ,गुलबर्गा अश्या अनेक राज्य व परराज्यतील भाविक सहभागी झाले होते चढवल्या नंतर लंगर (महाप्रसाद) महेफिले समा, सामूहिक कुराण पठण झाल्यानंतर जिल्हा भरातून आलेल्या कव्वालानी आपल्या कव्वाली सादर केल्या काही जणांनी आपले बाळाचे नवस साखर तुला पेढे तुला करून करण्यात आलेयावेळी सरपंच शबाना रहीम शेख ,उपसरपंच सैय्यद मतीन,माजी सरपंच सय्यद हारून,संजय कांजूणे,पोलीस निरीक्षक रेखा लोंढे,उपनिरीक्षक आयुब पठाण,सुनील बोडखे ग्रामपंचायत सदस्य सय्यद शेरू,मुन्नी बाजी,व शेख बाबा, सय्यद लाइकोदिन,सैय्यद शफीक, दर्गाह मुतवली शेख अमीर,शेख सलिम, शेख खुसरो,शेख मोइनोदीन, शेख सुलतान, शेख नदीम, शेख अहेमद ,शेख झिया,तसेच पंचकृषितील सर्व धर्मातील भाविक उपस्थित लोक उपस्थित होते

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५

# महाकवी वामनदादा कर्डक: सामाजिक व सांस्कृतिक इतिहासातील अजरामर पान



महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत, ज्यांनी आपल्या लेखणीने, वाणीने आणि कृतीने समाजाला जागृत केले. अन्याय, विषमता, दडपशाही आणि शोषणाविरुद्ध लढा देत, समाजातील दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी आपली लेखणी हेच हत्यार बनविणारे महाकवी वामनदादा कर्डक हे त्यापैकीच एक तेजस्वी, प्रखर आणि अढळ नाव आहे. ते केवळ कवी नव्हते, तर जनकवी, समाजसुधारक आणि खऱ्या अर्थाने लोकांचे मार्गदर्शक होते. त्यांच्या काव्यातून उफाळून येणारी अस्मितेची ज्वाला, अन्यायाविरुद्ध बंड पुकारणारा सूर, वंचितांच्या हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा आणि समाजातील अंधश्रद्धा, विषमता व अन्यायाविरुद्धची असहकाराची हाक ही त्यांच्या कवित्वाची वैशिष्ट्ये होती. १५ ऑगस्ट १९२२ रोजी जन्मलेले वामनदादा कर्डक हे एका युगाचे विचारवंत, प्रेरणास्त्रोत आणि समाजपरिवर्तनाचे धगधगते प्रतीक होते. त्यांचा जीवनप्रवास, कविता, सामाजिक चळवळीतील सहभाग आणि सांस्कृतिक लढ्यांमधील योगदानामुळे ते महाराष्ट्राच्या इतिहासातील एक अजरामर पान बनले आहेत.वामनदादा कर्डक हे नाव उच्चारले तरी महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासातील एका ज्वलंत पर्वाची आठवण होते. त्यांचे जीवन, त्यांची कविता आणि त्यांची सामाजिक बांधिलकी आजही आपल्याला प्रेरणा देत राहते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेचा त्यांच्यावर खोलवर परिणाम झाला होता. बाबासाहेबांनी दाखवलेल्या समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या मार्गावर चालत त्यांनी आपल्या लेखणीला सामाजिक न्यायाचे हत्यार बनवले. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा बाबासाहेबांनी दिलेला मंत्र त्यांनीजीवनभर अंगीकारला. त्यांनी आपल्या कवितांच्या माध्यमातून स्वातंत्र्याचे, समानतेचे आणि बंधुत्वाचे विचार जनमानसात पोहोचवले. ते खऱ्या अर्थाने लोककवी होते. ग्रामीण भागातील शोषित, पीडित, वंचित, मजूर, शेतकरी, महिला आणि वंचित बहुजन समाजाच्या भावना त्यांनी आपल्या कवितेतून निर्भीडपणे व्यक्त केल्या. त्यांच्या काव्यात केवळ दुःखाचे चित्रण नव्हते, तर त्या दुःखावर मात करण्याची प्रेरणा आणि लढ्याची ताकद होती.त्यांच्या सुप्रसिद्ध काव्यपंक्ती समाजातील अन्यायाच्या विरोधातील रणशिंगासारख्या होत्या. त्यांच्या काव्यपंक्ती केवळ भावस्पर्शी नव्हत्या, तर त्या जनतेला उठून उभे राहण्याचा संदेश देत होत्या. त्यांची कविता अत्यंत सोपी, सरळ आणि जनसामान्यांच्या मनाला भिडणारी होती. त्यात प्रगल्भ विचार, आक्रोश आणि आशेची ज्योत एकत्र नांदत असे. 'तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे, तुफान वारा पाऊस धारा मुळी न आम्हा शिवे, हल्ल्यावरती होती हल्ले अभंग अमुचे बाले किल्ले, असाच ताठर माथा अमुचा जरा न खाली लवे' या कवितेत वामनदादा स्वतःला आणि आपल्या सहकाऱ्यांना "तुफानातले दिवे" म्हणून संबोधतात. ही कविता न डगमगणाऱ्या संघर्षशील वृत्तीची घोषणाच आहे. ती फक्त वैयक्तिक लढ्याची गोष्ट सांगत नाही, तर ती दलित चळवळ, स्वाभिमान जागृती आणि अन्यायाविरुद्धच्या सामूहिक संघर्षाची रूपकात्मक कहाणी आहे. 'मी नदी निघाले भीमसागराकडे, का मनात झुरती इथले डोंगर कडे' ही कविता दलित समाजाच्या जागृतीचा, आंबेडकरी चळवळीचा आणि बदलाच्या प्रवासातील भावनिक टप्प्याचा दस्तऐवज आहे. इथे वामनदादांनी सांगितलेली नदी ही फक्त पाण्याची नसून, विचारांची, आंदोलनाची आणि आत्मसन्मानाची नदी आहे. 'वंदन माणसाला, वंदन माणसाला, काय कायेचे अन मायेचे चंदन माणसाला' ही कविता त्यांच्या मानववादी तत्त्वज्ञानाची, समानतेच्या विचारांची आणि भेदभावविरोधी भूमिकेची स्पष्ट घोषणा आहे. या कवितेत वामनदादा कर्डक, फुले-शाहू-आंबेडकर परंपरेतील मानवतावाद प्रतिध्वनीत करतात. 'मानसा इथे मी तुझे गीत गावे, असे गीत गावे तुझे हित व्हावे' ही कविता त्यांच्या मानवसेवा, समाजप्रेम आणि कलावंत म्हणून असलेल्या जबाबदारीची जाणीव यांची घोषणा आहे.वामनदादांच्या कवितांमध्ये सामाजिक संदेश आणि प्रबोधन यांचा उत्कृष्ट मिलाफ दिसतो. 'स्त्री जातीच्या मुक्तीसाठी आले महात्मा फुले ग, आले महात्मा फुले मुलींचे शिक्षण केले खुले ग' ही कविता स्त्रीशिक्षण, सामाजिक क्रांती आणि महात्मा जोतिराव फुले यांच्या योगदानाला अभिवादन करते. 'घरधनी मी सांगते तुम्हाला, माझ्या पेंघाला साळत घाला', 'छंद लागो तुला शिक्षणाचा मुला नको भटकू असा' आणि 'बाई जाईल तुझं दुःख सारं, बाळ होईल तुझं फौजदार' या कविता जनतेशी थेट संवाद साधतात, त्यांना प्रबोधन करतात आणि सामाजिक संदेश देतात. देशातील आर्थिक विषमता, भांडवलशाहीतून होणारे शोषण मांडताना वामनदादांनी थेट व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले. 'सांगा आम्हाला बिर्ला, बाटा, टाटा कुठाय हो! सांगा धनाचा साठा, आमचा वाटा कुठाय हो!!' ही कविता स्वातंत्र्योत्तर भारतातील विषमता, भांडवलदार वर्गाचे वर्चस्व आणि सर्वसामान्यांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला न मिळणे या परिस्थितीवर थेट हल्ला आहे.त्यांच्या कवितांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे महत्त्वही वारंवार दिसून येते. 'उपाशी जगाचा पसा भीम होता, असा भीम होता, असा भीम होता' ही कविता बाबासाहेबांच्या गरीब, पीडित आणि उपेक्षित जनतेवरील अपार प्रेम आणि त्यागपूर्ण जीवनकार्याचे सार सांगते. 'भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते, तलवारीचे तयाचे न्यारेच टोक असते' या कवितेत वामनदादा गुणवत्तापूर्ण नेतृत्व आणि सच्च्या अनुयायांचा अभाव व्यक्त करतात, तसेच कार्यकर्त्यांना चैतन्य देणारा संदेशही देतात. 'भीमरायाच्या मुला, तुडवाया टपले तुला', 'काल मुजरेच केले रे, माझ्या मेलेल्या बापाने, आज मुजरे मला करती, भीमाच्या प्रतापाने' आणि 'चांदण्याची छाया कापराची काया, माऊलीची माया होता माझा भीमराया' यांसारख्या कविता त्यांच्या काव्यशक्तीचा, आंबेडकरी विचारसरणीच्या प्रभावाचा आणि लोकभाषेतील क्रांतिकारक भावनांचा उत्कृष्ट नमुना आहेत.वामनदादांचे समाजसुधारणेतील योगदान विलक्षण आहे. त्यांनी अस्पृश्यता, जातिव्यवस्था, धार्मिक अंधश्रद्धा आणि स्त्री-दलितांवरील अन्यायाविरुद्ध लेखणी उचलली. त्यांनी आंबेडकरी चळवळ, मजदूर आंदोलन आणि सत्यशोधक विचारसरणीमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या कवितांनी असंख्य तरुणांना, कामगारांना आणि शेतकऱ्यांना संघटित होण्यासाठी, हक्कांसाठी लढण्यासाठी प्रेरित केले. ते केवळ समाजाच्या वेदना उलगडत नव्हते, तर त्या वेदना संपविण्यासाठी मार्गही दाखवत होते. त्यांची सांस्कृतिक लढाईदेखील महत्त्वाची आहे. त्यांनी लोककलेचा वापर जनजागृतीसाठी केला. गावोगावी, मेळाव्यांत, मोर्चांत त्यांनी कविता सादर करून हजारो लोकांना विचारप्रवृत्त केले. वामनदादांच्या कार्याचा परिणाम आजही जाणवतो. त्यांच्या कवितांमधील लढाऊ वृत्ती, सामाजिक न्यायाचा आग्रह, वंचितांप्रतीची निष्ठा आणि जनभाषेतील प्रभावी मांडणी यामुळे पुढील पिढ्यांतील कवींना, लेखकांना आणि कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळाली. आजही आंदोलने, सभा आणि मेळावे येथे वामनदादांच्या ओळी घोषवाक्यांसारख्या ऐकू येतात. त्यांचे साहित्य वाचण्याचे नसून, ते अनुभवण्याचे आहे. त्यांच्या साहित्यातील आक्रोश, वेदना, जिद्द आणि क्रांतीची हाक आजही सामाजिक वास्तवाशी घट्ट जोडलेली आहे. आजही समाजात अन्याय, विषमता आणि शोषणाचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत वामनदादांचे शब्द लोकांना उठून लढण्याची आणि परिवर्तन घडवण्याची प्रेरणा देतात.वामनदादांचे साहित्य केवळ कवितांपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक कविता, गाणी, पोवाडे, भारुड आणि लोकगीते लिहिली. त्यांच्या साहित्यात लोककलेची मोठी जाण दिसते. 'मी एक शाहीर' असे ते अभिमानाने म्हणत आणि त्यांनी लोककलेच्या माध्यमातून समाजमन जागृत केले. त्यांच्या साहित्यात उपरोधिक आणि ज्वलंत भाषाशैलीचा वापर आढळतो, पण त्याचसोबत मानवी भावनांचा ओलावाही होता. त्यांनी केवळ सामाजिक विषमतांवरच लिहिले नाही, तर प्रेम, निसर्ग आणि जीवनातील अन्य पैलूंवरही आपली लेखणी चालवली. मात्र, त्यांच्या लेखणीचे मूळ सूत्र नेहमीच समता आणि न्याय हेच राहिले. वामनदादा कर्डक यांचे जीवन एक संघर्षमय प्रवास होता. त्यांनी अनेक अडचणींचा सामना केला, पण त्यांची लेखणी कधी थांबली नाही. त्यांनी 'अंबेडकरी जलसा' या माध्यमातून महाराष्ट्रभर फिरून प्रबोधनाचे कार्य केले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना 'लोकशाहीर' आणि 'महाकवी' अशा अनेक उपाध्या मिळाल्या. त्यांच्यासाठी खरा पुरस्कार म्हणजे त्यांनी लोकांच्या मनात मिळवलेले स्थान होते. आज वामनदादा कर्डक यांचे नाव आंबेडकरी चळवळीच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरलेले आहे. त्यांची गाणी, त्यांच्या कविता आणि त्यांचे विचार आजही आपल्याला दिशा देत आहेत. समाजात आजही विषमता अस्तित्वात आहे. अशा वेळी वामनदादांसारख्या महाकवींच्या विचारांची आणि कार्याची अधिक गरज आहे.वामनदादा कर्डक हे केवळ एक साहित्यिक नव्हते, तर ते एक सामाजिक क्रांतीचे शिल्पकार होते. त्यांनी आपल्या लेखणीतून एक नवी पहाट आणण्याचा प्रयत्न केला. त्यांची कविता ही फक्त मनोरंजनासाठी नव्हती, तर ती एक सामाजिक बांधिलकी होती, एक सामाजिक जबाबदारी होती. त्यांचे विचार आणि कार्य चिरंतन आहे. त्यांचा संघर्ष, त्यांची काव्यवाणी आणि त्यांचा सामाजिक दृष्टिकोन प्रत्येक मराठी माणसाला अभिमानाने भरून टाकतो. त्यांच्या जीवनप्रवासाचा सारांश काढायचा तर वामनदादा हे संघर्षाचे गीतकार, समाजपरिवर्तनाचे शिल्पकार आणि सांस्कृतिक क्रांतीचे सेनानी होते. त्यांनी लेखणीला तलवार बनवून अन्यायाचा किल्ला उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आशेचा किरण दाखवून वंचितांच्या जीवनात नवा सूर्योदय घडविण्याची स्वप्ने पाहिली. त्यामुळेच ते महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासातील एक अजरामर पान ठरतात. त्यांच्या जयंतीदिनी त्यांना वाचणे, त्यांच्यावर विचार करणे आणि त्यांच्या विचारांना कृतीत उतरवणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
नाशिक
(लेखक, सहाय्यक प्राध्यापक असून समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत.)
मो. क्र. ९९६०१०३५८२,
ईमेल —bagate.rajendra4@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002